# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०२.०७.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०१.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमांवर कारवाई करून ५९,८२०/—रू. चा मुद्द्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०४ इसमांवर कारवाई करुन ३,१७०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३४५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६२,८३१/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) संपुर्ण गुन्हेशाखा पोलीस तथा पो. ठाणे सदर पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.०७.२०२६ चे ००.३० वा. ते ०५.३० वा. चे दरम्यान, संपुर्ण गुन्हेशाखा पोलीस व सदर पोलीस ठाणे चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे सदर हद्दीत व्हीसीए स्टेडीयम जवळील हॉटेल हेरीटेजचे पाचवे माळयावरील हाऊस ऑफ बीअर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे कॅफेचालक आरोपी गुरुप्रितसिंग हरजिंदरसिंग खंडुजा वय ४० वर्ष रा. सदर, नागपूर हा इतर तीन आरोपी वेटर यांचे मदतीने ४३ ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का व ईतर साहित्य असा एकुण २३,०६५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेचालक, वेटर, कॅफचे कॅप्टन व ग्राहक असे एकूण ४९ आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम २७२ भा.न्या.सं सहकलम ४,६,७,८,२०,२१,२४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८ सहकलम .अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्द्देमालासह सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे (गुन्हे), श्रीमती वितीता शाहु (उत्तर प्रभाग), मा. पोलीस उप आयुक्त श्री. दीपक अग्रवाल (डिटेक्शन), श्रीमती अन्नपुर्णा सिंह (परि.क्र. २), मा. सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य.गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे, श्री. सुहास जगताप (सदर विभाग) यांचे

मार्गदर्शनाखाली **गुन्हेशाखा येथे कार्यरत अधिकारी व अंमलदार यांनी सदर पोलीसांचे मदतीने संयुक्तिकरित्या केली**.

**<u>३) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाची कामगीरी :— वाहनचोरी करणाऱ्या आरोपींना अटक एकुण ०२ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक २५.०५.२०२६ चे ०३.३० वा. ते ०८.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी भुषण हरीभाऊ कुंटे वय ५२ वर्षे रा. फ्लॅट क्र. १, प्लॉट क्र. ५८, संवादी अपार्टमेंट, कॉग्रेस नगर, धंतोली, नागपूर यांनी त्यांची ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ३१ ईएक्स ३५१८ कि. ३०,०००/—रू. ची आपले अपार्टमेंटचे पार्कीगमध्ये लॉक करून पार्क करुन ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद मोपेड चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी क्र. १) अजय संजय सारवन वय २३ वर्षे, रा. क्वॉर्टर क्र. १२, सी विंग, मेडीकल कॉलनी, धंतोली, नागपूर २) युगांत उर्फ अंडा संजय कापसे वय १९ वर्ष रा. प्लॉट क्र. १०३, एनआयटी ले आऊट, अजनी चौक, धंतोली, नागपूर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक सखोल विचारपूस केली असता, त्यांनी या गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतून हिरो होंडा मोटर सायकल क्र. एमएच ३१ डीवाय ६२०४ असे एकुण ०२ वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपींना गुन्हयात अटक करून, त्यांचे ताब्यातुन चोरी केलेले ०२ दुचाकी वाहने किंमती अंदाजे १,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी धंतोली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहर, मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. नितीन चुलपार, पोहवा विलास कोकाटे, रोशन तिवारी, अजय शुक्ला, नितीन वर्मा, पंकज हेडाऊ व त्यांचे पथकाने केली.



**४) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०१.०७.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, संजीवनी ॲक्वा वॉटर सेंटर, बिडगाव येथे एक इसम शस्त्र बाळगून फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, घटनास्थळी जाऊन परिसरात पाहणी केली असता, प्राप्त वर्णनाचा एक इसम दुचाकीवर संशयीत हालचाली करतांना दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख उबेद शेख हबीब वय ३५ वर्षे रा. हसनबाग, दानिश लॉनजवळ, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आत लपविलेला एक लोखंडी चाकू कि. १०००/—रु. चा मिळून आला. आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी चाकू, ०२ मोबाईल फोन व होंडा शाईन मोटार सायकल असा एकूण ९१,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे भांडेवाडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य.गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकाने केली.

**५) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०१.०७.२०२६ चे १९.५० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, रामदेवबाबा टेकडी परिसरात सापळा रचून एका संशयीत हालचाली करणाऱ्या इसमास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आशिष लोकनारयण पांडे वय ३४ वर्षे रा. पेंशननगर, पोलीस लाईन टाकळीजवळ, गिट्टीखदान, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०२ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२६ दिनांक ०५.०५.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महिन्यांकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनाखाली मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख व त्यांचे पथकाने केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे प्रतापनगर:— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी संकेत संजय पतंगे वय २५ वर्ष रा. प्लॉट क्र. ७५०, सुदामपुरी, उमरेड रोड, नागपूर हे इंस्टाकार्ट कंपनीतर्फे फ्लिपकार्ट करीता ऑपरेटर मॅनेजर पदावर काम करतात. त्यांचे पोलीस ठाणे राणा प्रतापनगर हद्दीत मौजा परसोडी, गोपालनगर, व्हीएनआयटी गेट समोर, प्लॉट क्र. ०६ जवळ ऑफीस आहे. तेथे आरोपी नामे उमेश

कालिदास सोनवणे नावाचा डिलीव्हरी बॉयचे काम करतो. कंपनीचे ऑडीट केले असता, दिनांक ०१.०४.२०२६ चे १३.०० वा. २०.०६.२०२६ चे २३.०० वा. चे दरम्यान, आरोपी व त्याचे इतर साथीदार यांनी संगनमताने फिर्यादीचे कंपनीचे हबमधून आयफोन, कॅमेरा, ॲपल एअरपॉड, जोडे व इतर ११३ विविध प्रकारच्या वस्तु असा एकूण किंमती ४,८०,५९५/—रू. चा मुद्येमाल चोरी केल्याचे दिसून आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे मसपोनि. श्रध्दा वाघ ८३२९२९५२७६ यांनी आरोपींविरूध्द कलम ३०६,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कळमणा:— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २२.०६.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा लहान भाऊ नामे विलास गुलाबचंद जनवारे वय ४० वर्ष रा. प्लॉट क्र. ३४३, संतोषनगर, आंबेडकर मार्ग, नागसेनवन, यशोधरानगर, नागपूर हे त्यांचे सायकलने आपले कामावर वर्धमान नगर येथे जात असतांना, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, पारडी कडे जाणाऱ्या उडाणपुलाचे सुरूवातीला रिवाज लॉन समोर एका अज्ञात ट्रक चालकाने, त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे भावाचे सायकलला मागून धडक देऊन घटनास्थळावरून पळून गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे भावाचे डोक्याला मार लागल्याने ते गभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०१.०७.२०२६ रोजी डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे अज्ञात ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे एमआयडीसी</u> :—** फिर्यादी संगित सुरेश मरावी वय २१ वर्ष व त्यांचा सहकारी संदीप पंजीलाल मरावी वय २३ वर्ष रा. ग्राम चित्रा पोस्ट केदारपुर तह. घरसौर जि. शिवनी, मध्यप्रदेश हे पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत असोशियेशन बिस्कीट कंपनीचे गोदाम, प्लॉट क्र. १८, महानंदा दुध डेअरी मागे, हिंगणा रोड, एमआयडीसी येथे काम करतात व तेथेच हल्ली मुक्कामी असतात. दिनांक ०१.०७.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा सहकारी संदीप हा आंघोळ आटोपून त्याची अंडरविअर रुमचे खिडकीचे ग्रिलवर वाळविण्याकरीता टाकत असता, खिडकीजवळील असलेले इलेक्ट्रीक बोर्डला त्याचा स्पर्श झाल्याने, त्यास करंट लागून तो जखमी होऊन बेशुध्द झाला. त्यास उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी संदीप मरावी यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे एमआयडीसी येथे सपोनि. हेमंत कोकणी यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**